| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस<br>सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,<br>ठाणे शहर<br>इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in<br>भ्रमरध्वणी क्र.9819208279 | स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५० |

प्रेसनोट                                                   दि.११.१०.२०२४

## ''पत्नीचा खुन करून पसार झालेला आरोपी अवघ्या २४ तासाच्या आत अटक''

दि.०८.१०.२०२४ रोजी पहाटेच्या सुमारास, आरोपी भास्कर नारायण सदावर्ते, वय २९ वर्षे, रा.अण्णा पोळ चाळ, सिध्देश्वर तलावाजवळ, ठाणे पश्चिम याने चारिञ्यावर संशय घेवुन त्याच्या पत्नीचा गळा दाबुन खुन केला व तेथुन पसार झाला होता. सदर घटनेबाबत मयत स्त्री चे वडील श्री.साहेबराव विठ्ठल दुधमल, वय ५२ वर्षे रा.सिध्देश्वर तलाव जवळ, नौपाडा, ठाणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नौपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.। १०२४/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक (गुन्हे)/श्री.शरद कुंभार हे करीत होते.

गुन्हयाच्या तपासादरम्यान येथील आरोपी त्याचे मुळ गावी नांदेड येथे रेल्वेने जात असल्याची माहिती पोलीसांना मिळाली त्यावरून सदर आरोपीच्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषन करून नौपाडा पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/मंगेश भांगे व पथकातील पोलीस अंमलदार यांनी कसारा रेल्वे स्टेशन परीसरात सापळा रचला व रेल्वे स्टेशन, प्लॅट फॉर्म व अजुबाजूचे परिसरात आरोपीचा शोध घेत असतांना आरोपी हा रेल्वेतुन उतरून ट्रॅकवरून पळून जात असताना पोलीसांनी त्याचा पाठलाग करून त्यास शिताफीने पकडले आहे. सदर आरोपीस दि.०९.१०.२०२४ रोजी अटक करून मा.न्यायालयात हजर केले असता त्यास मा.न्यायालयाने दि.१२.१०.२०२४ रोजी पावेतो पोलीस कस्टडी दिली आहे.

सदर कामगिरी अपोआ,प.प्रा.वि/श्री.विनायक देशमुख, पोउपआ,परि.१/श्री.सुभाष बुरसे, सपोआ/श्रीमती प्रिया डमाळे, नौपाडा विभाग, वपोनि/श्री.अभय महाजन, पोनि(गुन्हे)/श्री.शरद कुंभार यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/भांगे, पोउपनि/मकानदार, पोहवा/गायकवाड, पोहवा/पाटील, पोहवा/देसाई, पोहवा/रांजणे, पोहवा/गोलवड, पोहवा/तडवी, पोना/ माळी, पोशि/कांगणे, पोशि/तिर्थकर यांनी केलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर